# शतकातील आदिवासी कविता: सांस्कृतिक आणि सामाजिक जीवन

**वृषाली कदम**

मराठी विभाग प्रमुख, मराठा मंडळ पदवी महाविद्यालय बेळगाव.

DOI: https://doi.org/10.5281/zenodo.17259750

## ABSTRACT:

प्रस्तुत लेख 'शतकातील आदिवासी कविता' या कवितासंग्रहाच्या आधारे आदिवासी समाजाच्या सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनाचे चित्रण करतो. साठोत्तरी काळात दलित व ग्रामीण साहित्याच्या प्रभावातून आदिवासी साहित्यप्रवाह उदयास आला. भुजंग मेश्राम, वाहरू सोनवणे आणि डॉ. विनायक तुमराम यांच्यासारख्या कवींनी आपल्या लेखणीतून आदिवासींच्या शोषण, दुःख, अन्याय आणि दारिद्र्याचे वास्तव मांडले.

या कविता आदिवासींच्या निरागस, श्रमप्रधान जीवनशैली, निसर्गाशी असलेले त्यांचे निकोप नाते, सामाजिक एकत्मता आणि सणउत्सवांचे (उदा. लग्नसोहळा, होळी) साधे, उत्साही स्वरूप दर्शवतात. त्याचबरोबर भूकेचा तीव्र संघर्ष, दारिद्र्य आणि अस्थैर्यपूर्ण जीवन यावरही त्या प्रकाश टाकतात. आदिवासी कवी माणुसकी आणि स्वातंत्र्याचा आग्रह धरून, आपल्या अस्मितेचा शोध घेतात आणि समाजाच्या विकासातील अडथळे दूर करण्यासाठी धडपडतात.

## KEYWORDS:

आदिवासी कविता, सामाजिक जीवन, सांस्कृतिक अस्मिता, दारिद्र्य आणि शोषण, जीवन संघर्ष.

साठोत्तरी काळात जनसामान्यांच्या जाणिवा बदलून त्या जाणीवा व्यापक बनलेल्या दिसतात. ग्रामीण, दलित, आदिवासी, भटके, विमुक्त, भूमीहीन, शेतमजूर, कष्टकरी, शेतकरी वर्ग एकूणच बहुजन समाज मुख्य धारेत येऊन मुक्त श्वास घेण्यास धडपडू लागला. आपल्या अस्तित्वाची जाणीव करून देण्यासाठी लोकशाही, राज्यघटनेतील मार्गदर्शन तत्वे समजून घेऊन शोषण विरहित समाजाची भाषा बोलू लागला. आपल्या जीवनानुभवाचे स्वरूप शब्दबद्ध करू लागला.

शिक्षण घेऊन सामाजिक, वाङ्मयीन चळवळी उभारू लागला. आपली व्यथा, वेदना, दुःख, प्रकट करून माणूसपणाची ओळख देऊ लागला. अनेकजन लेखन साहित्यामार्फत आपापल्या समाजाचे प्रतिनिधित्व करू लागले. यामधून दलित, ग्रामीण, आदिवासी, स्त्रीवादी, जैन, ख्रिश्चन, मुस्लिम असे अनेक साहित्य प्रवाह उदयास आलेले आहेत.

मराठी साहित्यातील एक प्रवाह या अंगाने आदिवासी साहित्याची मांडणी पाहताना असे दिसून येते की, मानवतावादी मूल्यांची प्रतिष्ठापना करण्याचा बुद्ध, फुले आणि आंबेडकर यांच्या विचारांचे आणि कार्याचे अधिष्ठान यामध्ये आहे. प्रस्थापित व्यवस्थेच्या संदर्भात नकार, चीड, बंडखोरी, विद्रोह करणे आणि माणूस म्हणून स्वतःचे हक्क आणि अधिकार मिळविणे. मानवतावादी मूल्यांच्या आधारे आपल्या समाजाच्या विकासातील अडथळे दूर करण्यासाठी धडपडणारे, मराठी साहित्यातील एक प्रवाह म्हणून पहात असताना त्याचे वेगवेगळे आयाम आपल्या लक्षात येऊ लागतात. शतकातील आदिवासी साहित्याचा सामाजिक अंगाने विचार करण्यासाठी आपण आदिवासी म्हणजे कोण? नेमकेपणाने आदिवासी कोणाला म्हणावे? हे पाहणे गरजेचे आहे. यासाठी विविध मानसशास्त्रज्ञांनी व अभ्यासकानी आदिम समाजाच्या केलेल्या व्याख्या विचारात घेणे आवश्यक आहे या व्याख्या खालील प्रमाणे आहेत.

**व्याख्या**

1. गेलीन यांच्या मते, " एका विशिष्ट भूप्रदेशावर राहणारा, समान बोलीभाषा बोलणारा व समान सांस्कृतिक जीवन जगणारा, पण अक्षर ओळख नसलेल्या स्थानीय गटांच्या समुच्चयाला आदिवासी समाज म्हणतात."[1]
2. इ.स.सन 1962 साली शिलॉंग मध्ये आदिवासी समाजाच्या परिषदेने आदिवासींची व्याख्या केली आहे. ती खालील प्रमाणे आहे. "एका समान भाषेचा वापर करणाऱ्या, एकाच पूर्वजापासून उत्पत्ती सांगणारा, एका विशिष्ट भूप्रदेशात वास्तव्य करणाऱ्या, तंत्रशास्त्रीय ज्ञानाच्या दृष्टीने मागासलेला, अक्षर ओळख नसलेल्या व रक्त संबंधांवर आधारित सामाजिक व राजकीय रितीरिवाजांचे प्रामाणिकपणे पालन करणाऱ्या एजजिनसी गटाला आदिवासी समाज म्हणतात."[2]
3. "डी. एन. मजुमदार यांनी आदिवासींची सर्व लक्षणे लक्षात घेऊन त्यांची विस्तृत व्याख्या केली आहे. ते म्हणतात, "समान नाव असणारा, एकाच भूप्रदेशात वास्तव करणारा, एकच भाषा बोलणारा व विवाह, व्यवसाय इत्यादी बाबतीत समान

निषेध नियमांचे पालन करणारा व परस्पर उत्तरदायित्व निर्माण करण्याच्या दृष्टीने एक पद्धतशीर व्यवस्था स्वीकारणाऱ्या कुटुंबाचे किंवा कुटुंब समूहाचे एकत्रीकरण म्हणजे आदिवासी समाज होय."[3]

4. डॉ. रिव्हर्स म्हणतात, "ज्या समूहातील सदस्य एकसमान बोलीभाषा बोलतात, युद्ध वगैरे सारख्या उद्दिष्टपूर्तीकरीता एक होऊन झटतात, अशा सरळ व साध्या सामाजिक समूहाला आदिवासी समाज असे म्हणतात."[4]
5. "इंपीरियल गॅझेटमध्ये आदिवासींची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे. "समान बोलीभाषा बोलणाऱ्या, एकाच भू भागात राहणाऱ्या, सुरुवातीला अंतर्विवाह असण्याची शक्यता असलेला पण सर्वसामान्यपणे अंतर्विवाह नसलेल्या व समान नाव धारण करणाऱ्या कुटुंबांच्या समुच्चयाला आदिवासी समाज, असे म्हणतात."[5]

अशाप्रकारे वरील सर्व व्याख्या आदिम अशा आदिवासींच्यासाठी समान अशी वैशिष्ट्ये गृहीत धरून त्यांना आदिवासी संबोधले आहे. या आदिवासींना स्वतःची अशी संस्कृती आहे. परंपरागतरित्या जंगलात राहूनही स्वतःची एक वेगळी संस्कृती जोपासतो, आपल्या श्रद्धा, कल्पनांना जीवापाड जपतो , ' शतकातील आदिवासी कविता' या संग्रहातील त्यांचे जीवन चित्रण हे नवीन जीवनाचा परिचय करून देणारे असे आहे.

आदिवासी साहित्याचा अभ्यास करत असताना असे दिसून येते की, काळाच्या मागणीनुसार जीवन विषयक धारणा बदलत गेलेल्या आहेत. दलित, भटका, विमुक्त यांच्याबरोबर समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर असलेला आदिवासी समाज यांच्याकडे प्रस्थापितांची पाहण्याची दृष्टी बदलली. विशेषतः साठोत्तरी काळात ग्रामीण, दलित लेखकांच्या बरोबरीने जागृत आदिवासी तरुणांनी येण्याची प्रयत्न केले.

"तुम्ही संमेलन घेता, मोर्चे काढता आणि समस्त आदिवासी निसर्गासारखं निरागस आणि सकारण जगण्याची प्रबळ इच्छा उंचावून पुढे येतात. तेव्हा आमच्या लेखण्यांना वाचा फुटते." अशी कबुली भुजंग मेश्राम यांनी दिली आहे.[6]

अर्थात शिक्षित आदिवासींच्या मनाला दलित आणि ग्रामीण साहित्य पाहून त्यांनी जाणीवपूर्वक आपल्या आदिवासी जीवनाचा विचार केला त्यातून आदिवासी कविता निर्माण झालेली दिसते. प्रस्थापित समाजाच्या मुख्य प्रवाहात आपलेही स्थान असल्याचे हक्क

त्यांनी बजावले. आदिवासी तरुणांनी शिक्षण घेतले. शहरात नोकरी करू लागले. त्यांच्या साहित्यिक जाणीवा ही स्पष्ट होत गेल्या. त्यामुळे त्यांच्या जीवनावर आधारित जीवनानुभवालाच साहित्य रूप देण्याच्या प्रयत्नामुळेच आदिवासी साहित्य निर्माण झालेले दिसते. या साहित्याचा प्रथम उद्गार म्हणजे काव्य. मराठी काव्य सृष्टीमध्ये आदिवासी कवितेने आपले वेगळेपण जपले आहे. भुजंग मेश्राम, वाहरू सोनवणे, डॉ. विनायक तुमराम यांची कविता मराठी काव्य प्रवाहात आपला प्रभाव सिद्ध करणारी ठरते. म्हणून अनेक विविध प्रेरणा व प्रवृत्तीनी गजबजलेल्या काव्य प्रवाहात आदिवासी कविता ही लक्षवेधी बनलेली दिसते. या कविता म्हणजे शतकनुशतके शोषण, दुःख आणि अन्याय, अत्याचार वाट्याला आलेल्या आदिवासी जीवनाचे चित्र ही कविता रेखाटताना दिसते. ही कविता निसर्गाशी निकोप नाते राखून निर्मळ मनाने आपला सांस्कृतिक वारसा प्रकट करते. त्यावर अतिक्रमण होताना आदिवासींचे जीवन प्रदूषित झाल्याचे सांगते. युगानुयुगाचे दारिद्र्य, शोषण, भूक, कुपोषण यांची मीमांसा करीत विशिष्ट काव्यविचार प्रकट करते. आदिवासी जीवनाची उत्कट अभिव्यक्ती आदिवासी कवितातून व्यक्त झालेली पाहायला मिळते. गुलामगिरीतून स्वातंत्र्याचा व माणुसकीचा आग्रह धरणारी ही कविता आहे. जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श करून काल, आज आणि उद्याच्या स्थितीचा आलेख मांडताना दिसते. त्यांच्या कवितेची काही वैशिष्ट्ये खालील कवितांमधून लक्षात येतात. प्रतिनिधिक स्वरूपात काही कवितांचा उल्लेख खाली केलेला आहे. ज्यामधून आदिवासी कवींची भूमिका आणि त्यांच्या काव्याचे प्रयोजन आपल्या लक्षात येण्यास मदत होते.

आदिवासी कविता आपल्या संवेदना, भावना आणि विचारांच्या माध्यमातून आदिवासींच्या जीवनातील विविध बिंदूंना व्यक्त करताना दिसते. आदिवासी कवितेच्या अभिव्यक्ती संदर्भात असे म्हटले जाते की, "अपनी तीव्र भावनाओंको और संवेदनाओंको आदिवासी नृत्य की लयसे लोकगीतोमे साकार करते है | अपने पर्यावरण के जड चेतन तत्वोंसे उनके रंगों का प्रयोग मेल खाता है| उनका वास्तविक जीवन प्रतिकूलताओंसे भरा दुःख और यातनापूर्ण होने पर भी वे अपनी अन्न शरीर शक्ती के स्तोत्रों से संभल पाते है तथा गान संगीत नृत्य मे अपने सुख की अभिव्यक्ती करते है|"[7]

आदिवासी कवितांमध्ये आदिवासींच्या भावनेसोबतच गीत संगीत आणि नृत्य यांचा परिचय दिसून येतो डॉक्टर भगवान गराडे आदिवासी संस्कृतीच्या कवितेत आदिवासी अस्मिता आणि संस्कृतीचा परिचय करून देताना म्हणतात

**"हमारा घर जंगल जमीन**
**हमारा संसार खेत खलियान**
**हमारी संतान पशुपक्षी धन**
**हमारा अंगण हरे भरे धान**
**हमारा मान सन्मान बच्चों की मुस्कान."[8]**

आदिवासींच्या हजारो वर्षापासून पाणी जंगल जमीन यांच्याशी जवळीक राहिलेली आहे त्यांचे राहायचे ठिकाणच हे आहे पर्यावरणातील प्रत्येक जीव जंतू पशुपक्षी प्राणी पेड पौधे उनके मित्र हे साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त कवी आदित्यकुमार मांडी पहचान कवितेत म्हणतात आदिवासी पहचान उनकी जन्मभूमी और कर्मभूमी से ही होती है जब आपके पहचान पर प्रश्न विचारले जातात तेव्हा न डगमगता उत्तर दिलं पाहिजे की तुम्ही कुठल्या मातीच्या आहात कुठल्या क्षेत्र आणि भूमिती राहत कारण तुमची ओळख कायम राहील.

**"जवाब आपको देना है**
**जन्मभूमी कर्मभूमी और खुदका भी**
**तो आप क्या हो?**
**या सवाल करे स्वयंसे और फिर जवाब दो**
**बेहचक बताओ उस मिट्टी के बारे मे**
**जिससे गढे गये हो तुम**
**जिस दिन साफ कर ही तुमने मिट्टी**
**सोचना क्या पहचान रहे जायेगी तुम्हारी"[9]**

आदिवासी कवितेतून स्त्री आणि समाज या धारेतील स्त्रीची अस्मिता स्पष्ट करताना कवी म्हणतो एक वाचक म्हणून देशाचे नागरिक म्हणून भारतीयांनी बघितलं पाहिजे की आदिवासी स्त्रीची दशा आणि दिशा काय आहे. ती आदिवासी जीवन आणि जंगलांचे नाते आदिवासींच्या जीवन पद्धतीमध्ये जंगलामध्ये उत्पन्न होणाऱ्या झाडे वेली यांना महत्त्वाचे स्थान आहे. यामध्ये सारख्या कित्येक वनस्पती त्यांच्या

परिचयाच्या आहेतया कवितांमधून अनेक कवींनी जीवन वास्तव रेखाटण्यावर भर दिलेला दिसतो. आदिवासी जीवन मुले या कवितांचे अधिष्ठान आहे यामागे अस्मितेचा शोध घेणे हे आदिवासी कवितांचे लक्षण आहे. वारल्यांच्या सहवासात ही कविता आदिवासींच्या जीवनशैलीचे आणि अनुभवाचे चित्रण करते त्यांच्या कुटुंबाच्या घराघरातील साधेपणा कष्ट प्रेमभावना यांचे दर्शन घडते.

त्यांची घरे म्हणजेच झोपड्या त्यांच्या घरावर होती सागाची पानं, बांबूच्या काठ्या आणि गवताचं छप्पर त्यामध्ये माणसं एकमेकांना सहाय्य करीत जीवन जगतात. याच कवितेत आदिवासींच्या एकत्रित जीवनशैलीचे सामाजिक एकात्मतेची आणि श्रम प्रधान संस्कृतीची झलक आहे. त्यांचे जीवन हे श्रमसाचर्य आणि जिवंत तत्वाने भरलेले आहे. समाधान युवती साधेपणा सोबतच त्यांच्या जीवनातील संघर्ष तगमग आणि अहंभावाच्या पलीकडे असलेली बांधीलकी या कवितेतून व्यक्त होते. या कवितेतून कवी समाजाला एकात्मतेचा संदेश देऊ पाहतो. लग्नासारखा सोहळा मोठ्या कौतुकाने येथे साजरा होतो दिवाळी सण देखील मोठ्या उत्साहाने साजरे करतात हे खालील हवे तेथून व्यक्त होते. वेळप्रसंगी एकत्रितपणे रिंगण करून पावलांच्या तालावर नाच गाणे करत रात्र जागरण देखील करतात. दमेपर्यंत नाचत राहतात. यालाच ते जीवन म्हणतात.

जीवन जगत असताना या समाजाच्या विविध भावावस्था संघर्ष नजरेत भरण्यासारखा आहे. त्याचा वेद ती माणसंच होती, सकाळपासून संध्याकाळपर्यंत या कवितेतून प्रकर्षाने घेता येईल.

**“सकाळपासून संध्याकाळपर्यंत रानावनात धडपडणारी**
**घरातल्या चाऱ्यासाठी रानातल्या वाऱ्यासाठी**
**दारिद्र्याच्या काटेरी पायवाटा तुडवत चाललेली**
**ती माणसेच होती”**[10]

या आदिवासींच्या पाचवीला दारिद्र्य पूजलेलं दिसून येत. आदिवासी जो आहे तो काळा रंगाचा, नागडा उघडा बोडका, पोट खपाटीला गेलेला, कवटीत डोळे अडकलेले, अकाली आलेले म्हातारपण, धडपडत जगाला निघालेला असा आदिवासी ती माणसच होती या कवितेतून चित्रीत केलेला पाहायला मिळतो

**वारली पाडा**

आदिवासी म्हणजे कळकाने जिथे राहतात त्या वस्तीला पाडा म्हणतात हा पाढा पंधरावीस घरांचा झोपड्या झोपड्यांचा आणि तुटक्या छप्परांचा असतो मानसे देखील अकाली म्हातारपण आलेली वर्णाने काळी सावळी अर्धवस्थ परिधान केलेली त्यांची घरे सागाच्या पानाने बांबूच्या काठ्याकुट्याने आणि गवताचे छक्कर भिंती कुडाच्या सेना मातीने लिपलेल्या आणि मधूनच वाकलेल्या अशा असतात या लोकांना जन्म आणि मृत्यूपेक्षा लग्न सोहळयाचा विशेष कौतुक असतं. होळी दिवाळी नव्हती यासारख्या सणांना शेती पिकली चांगले धान्य प्राप्त झाले तर लोक रिंगण धरून नाच गाणे करून आपला आनंद उत्सव साजरा करतात आणि आपल्या कष्टाच्या दुनियेमध्ये थोडासा विरंगुळा प्राप्त करतात घराच्या भिंती रंगत नाच गाणे रात्रीच्या वेळी बाया माणसे मुले मुली एकत्र येतात आणि हातात हात कमरेत हात घेऊन पाय पुढे पुढे मागे करत कमरेमध्ये वाकून रिंगण करून पुढे मागे डावी उजवी पावले टाकत घुमरे घूम असे म्हणत रात्रभर नाच गाणे करत आपला आनंद साजरा करतात.

आदिवासी कविता आपल्या संवेदना, भावना आणि विचारांच्या माध्यमातून आदिवासींच्या जीवनातील विविध बिंदूंना व्यक्त करताना दिसते. आदिवासी कवितेच्या अभिव्यक्ती संदर्भात असे म्हटले जाते की, “अपनी तीव्र भावनाओंको और संवेदनाओंको आदिवासी नृत्य की लयसे लोकगीतोमे साकार करते है | अपने पर्यावरण के जड चेतन तत्वोंसे उनके रंगों का प्रयोग मेल खाता है| उनका वास्तविक जीवन प्रतिकूलताओंसे भरा दुःख और यातनापूर्ण होने पर भी वे अपनी अन्न शरीर शक्ती के स्तोत्रों से संभल पाते है तथा गान संगीत नृत्य मे अपने सुख की अभिव्यक्ती करते है|”

आदिवासी कवितेतून स्त्री आणि समाज या धारेतील स्त्रीची अस्मिता स्पष्ट करताना कवी म्हणतो एक वाचक म्हणून देशाचे नागरिक म्हणून भारतीयांनी बघितलं पाहिजे की, आदिवासी स्त्रीची दशा आणि दिशा काय आहे. आदिवासी जीवन मूल्ये या कवितांचे अधिष्ठान आहेत. यामागे अस्मितेचा शोध घेणे हे आदिवासी कवितांचे लक्षण आहे.

‘शतकातील आदिवासी कविता’ या कवितासंग्रहामध्ये डॉ.

विनायक तुमराम यांनी एकूण 22 कवींच्या सुमारे 106 कवितांचा समावेश केला आहे. या कवितांच्या आधारे आदिवासींच्या सामाजिक जाणीवा समजून घेता येतील. त्या खालील प्रमाणे

## आदिवासी जीवनशैली

'वारल्यांच्या सहवासात' ही कविता आदिवासींच्या जीवनशैलीचे आणि अनुभवाचे चित्रण करते. त्यांच्या घराघरातील साधेपणा, कष्ट, प्रेमभावना यांचे दर्शन घडते. त्यांची घरे म्हणजेच झोपड्या.

**"त्यांच्या घरावर होती सागाची पानं**
**बांबूच्या काठ्या आणि गवताचं छप्पर"[11]**

त्यामध्ये माणसं एकमेकांना सहाय्य करीत जीवन जगतात.

याच कवितेत आदिवासींच्या एकत्रित जीवनशैलीची, सामाजिक एकात्मतेची आणि श्रमप्रधान संस्कृतीची झलक आहे. त्यांचे जीवन हे श्रमसाहचर्य आणि जिवंत तत्वाने भरलेले आहे. समाधान युक्त साधेपणा सोबतच त्यांच्या जीवनातील संघर्ष तगमग आणि अहंभावाच्या पलीकडे असलेली बांधीलकी या कवितेतून व्यक्त होते. या कवितेतून कवी समाजाला एकात्मतेचा संदेश देऊ पाहतो. लग्नासारखा सोहळा मोठ्या कौतुकाने येथे साजरा होतो. दिवाळी सण देखील मोठ्या उत्साहाने साजरे करतात. हे खालील ओळीतून व्यक्त होते.

**"कौतुक अधिक लग्न सोहळयाचं**
**होळी दिवाळी नव्हती सणाचं"[12]**

वेळप्रसंगी एकत्रितपणे रिंगण करून पावलांच्या तालावर नाच गाणे करत रात्र जागरण देखील करतात. दमेपर्यंत नाचत राहतात यालाच ते जीवन म्हणतात.

## जीवन संघर्ष

जीवन जगत असताना या समाजाच्या विविध भावावस्था, संघर्ष नजरेत भरण्यासारखा आहे. त्याचा वेद 'ती माणसंच होती' या कवितेत घेतलेला दिसतो.

**"सकाळपासून संध्याकाळपर्यंत**
**रानावनात धडपडणारी**

**घरातल्या चाऱ्यासाठी**
**दारिद्र्याच्या पायवाटा तुडवत चाललेली.”[13]**

या कवितेतून प्रकर्षाने वेद घेता येईल.

## दारिद्र्य

या आदिवासींच्या पाचवीला दारिद्र्य पूजलेलं दिसून येत आदिवासी जो आहे तो काळया रंगाचा, नागडा,उघडा, बोडका पोट खपाटीला गेलेला, कवटीत डोळे, अकाली आलेले म्हातारपण धडपडत जगाला निघालेला असा आदिवासी ‘ ती माणसच होती’ या कवितेतून चित्रीत केलेला पाहायला मिळतो.

**“मूळ रहिवासी आदिवासी**
**फोडतो टाहो**
**हजारो वर्षापासून**
**नाही त्यांना अन्न पोटभर ना उन्हाळयात पाणी घोटभर**
**ना कपडा ना घरदार**
**उघडे त्यांच्या झोपडीचे दार”[14]**

## नृत्य

होळी, दिवाळी, नवती यासारख्या सणांना, शेती पिकली चांगले धान्य प्राप्त झाले तर लोक रिंगण धरून नाच गाणे करून आपला आनंद उत्सव साजरा करतात. आपल्या कष्टाच्या दुनियेमध्ये थोडासा विरंगुळा प्राप्त करतात. रात्रीच्या वेळी बाया माणसे, मुले मुली एकत्र येतात आणि हातात हात कमरेत हात घेऊन पाय पुढे पुढे मागे करत कमरेमध्ये वाकून रिंगण करून पुढे मागे डावी उजवी पावले टाकत घुमरे घूम... असे म्हणत रात्रभर नाच गाणे करत आपला आनंद साजरा करतात.

स्वातंत्र्याच्या अर्ध्या शतकाची वाटचाल करूनही त्यांच्या जीवनात स्थैर्य आलेले नाही माणसानेच माणसाच्या वाट्याला आणलेले अधिनपेक्षेचे जगणे माधव सरकुंडे ठणक या कवितेतून दर्शवून देतात ते म्हणतात,

**“आपल्याच मायभूमीत**
**तळहाताएवढी भूमी नसावी आपली**

**दाही दिशातून नुसती**
**द्वेषाची दुर्गंधीच यावी"[15]**

तर दशरथ माडवी यांनी भल्या पहाटे उठून उदरनिर्वाहाची सोय करून पाहणाऱ्या आदिवासींची रानात चाललेली भटकंती, धडपड चित्रीत केली आहे. पोटातल्या भुकेसाठी मोह फूल गोळा करण्यासाठी रानात जावं लागतं. हे त्यांच्या नित्यनेमाचं असतं. यावेळी जीव घेणे दुःखद प्रसंग त्यांच्यावर ओढतात. हे सांगताना ते म्हणतात,

**"एक रात मोहाखाली जागता जातात**
**नकळत आम्ही झोपी गेलो, मोहाच्या वासानं डोम्या नाग सरकत आला**
**माझ्या सोबतच्या दमडू आत्रामला**
**डंख मारून निघून गेला...**
**.....माझ्या डोळया देखत दमडू तडफडत मेला..."[16]**

## भूक

उत्पन्नाचे साधन नसल्यामुळे भूकही त्यांच्या जीवनातील सर्वात जास्त वेदना देणारी गोष्ट ठरते घरदार नसलेल्या दरिद्री आदिवासींच्या दुःखाची प्रचिती बाबाराव मडावी यांची कविता आणून देते

**"आतून पोटात भूक**
**अन वरून झोपडीत**
**घुसणारं पाणी**
**आमचा जीव घेऊन जायचा..."[17]**

याच आशयाची दुसरी कविता ' जिणे उघड्यावर'

**"पिढ्यानपिढ्या पोटात भुकेने**
**पेटलेली आग आहे**
**सात जन्माचे दारिद्र्य फक्त**
**आमच्या नशिबी आहे**
**नाही घरदार जिने उघड्यावर**
**आम्हा भाग आहे'."[18]**

अशाप्रकारे अनेक आदिवासी कवींनी समस्त आदिवासी जाती जमातीच्या व्यथा वेदनांचा आपल्या काव्यातून वेद घेताना त्यांच्या

जीवनातील परिवर्तनाचा विचार प्रामुख्याने मांडलेला आहे. आदिवासी समाजाचे परंपरागत दुःख, व्यथा, वेदना याविषयी काव्यातून विचार मांडताना दिसतात.

**संदर्भ:**

1. 1 ते 8 पर्यंतचे संदर्भ आदिवासी साहित्य प्रवाह, डॉ. मनोहर सुरवाडे, सुगम प्रकाशन अमरावती, प्रथम आवृत्ती, पाच जुलै 2012 पृष्ठ क्रमांक 11
2. शतकातील आदिवासी कविता संपादक प्रा. डॉ. विनायक तुमराम. या कवितासंग्रहातील कवितांमधील संदर्भ क्रमांक 12 ते 18 पर्यंतचे संदर्भ आहेत. पृष्ठ क्रमांक 122, 125, 182, 218, 274.

**Funding:**

This study was not funded by any grant.

**Conflict of interest:**

The Authors have no conflict of interest to declare that they are relevant to the content of this article.

**About the License:**

© The Authors 2024. The text of this article is open access and licensed under a Creative Commons Attribution 4.0 International License.